# नागरिकांची सनद

# विधि व न्याय विभाग

# मंत्रालय,

# मुंबई-४०० ०३२.

# प्रस्तावना

यापूर्वी प्रसिध्द केलेल्या नागरिकांच्या सनदेत यथायोग्य सुधारणा करुन ती पुन्हा प्रसिध्द करण्यात येत आहे.

मंत्रालयातील विधि व न्याय विभाग हा मुख्यत: तांत्रिक विभाग आहे. त्याच्या दोन शाखा असून त्यापैकी एक विधिविषयक आणि दुसरी विधिविषयेतर काम पाहणारी आहे.

विधिविषयक कामाचे तीन भाग पडतात. विधि विधान मसुदे तयार करणे, मंत्रालयीन विभागांना वैधानिक बाबींवर (अभिप्राय)सल्ले देणे आणि कज्जे व अभिहस्तांतरण लेखनविषयक कामे करणे असे ते तीन भाग आहेत.

विधि विषयेतर शाखेमध्येही, विधि व न्याय विभाग (खुद्द), मा.उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालये, कुटुंब न्यायालये, लघुवाद न्यायालये व इतर दुय्यम कनिष्ठ न्यायालये, विशेष न्यायालये, धर्मादाय संस्था, विधि सेवा प्राधिकरण तसेच महाप्रशासक व शासकीय विश्वस्त यांच्याशी संबधित आस्थापना विषयक व वित्त विषयक बाबींवर कार्यवाही केली जाते. याशिवाय सरकारी वकील, सादरकर्ता अधिकारी यांच्या नियुक्तीचे आदेश काढणे इत्यादि कामे विधि व न्याय विभाग करीत असते. प्रशासकीय बाबींची कामे एकूण २६ कार्यासने पाहतात.

विधि व न्याय विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वागणूक देण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकारी / कर्मचा-यांची राहील. आपल्या राज्यातील जनतेस ही नागरिकांची सनद पुस्तिका अत्यंत उपयुक्त होईल, अशी अपेक्षा आहे.

**विधि व न्याय विभाग (खुद्द) ( नागपूर व औरंगाबादसह)**
**(मंत्रालय खुद्द)**
**नागरिकांची सनद**
**विभागाच्या कामाचा सविस्तर तपशील**

**(१) विधिविषयक शाखा**

**(अ) विधि विधानाचे मसुदे तयार करणारा भाग :**

विधि व न्याय विभागाच्या ह्या शाखेस **"ब"** शाखा असे संबोधले जाते. या शाखेकडून पुढील कामे हाताळली जातात.

**(१)** विधि विधानाचे काम म्हणजे भारतीय राज्य घटनेच्या सातव्या परिशिष्टातील याद्या २ व ३ यात नमूद केलेल्या सर्व राज्य व समवर्ती सुचीतील विषयासंबंधीची शासकीय विधेयके व अध्यादेश या संबंधात कार्यवाही होय. तसेच, सर्व गौण विधि विधानाचे मसुदे म्हणजे सांविधानिक नियम, उपविधी, अधिसूचना, आदेश, योजना व तत्सम इतर लेख जे केंद्रीय अधिनियमाखाली अगर राज्य अधिनियमाखाली काढावयाचे असतात त्यांचे मसुदे तपासण्याचे/ छाननी करण्याचे काम ही शाखा करते. ही शाखा वेगवेगळया मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी तयार केलेल्या विधि विधान विषयक प्रस्तावांना त्याचप्रमाणे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून आलेल्या अशासकीय विधेयकांचा अंमल करण्याकरिता कोणत्याही विधि विधानाचे काम हाती घेण्याच्या इष्टतेचा व सक्षमतेचा प्रश्न विधिविषयक दृष्टीकोनातून तपासून पाहते. या अनुषंगाने राज्याच्या विधिमंडळाशी संबंधित असलेल्या सर्व तांत्रिक बाबींचे कामही याच शाखेमार्फत करण्यात येत असते.

**(२)**महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेले सर्व राज्य अधिनियम असलेले महाराष्ट्र संहिता हे एक शासकीय प्रकाशन आहे. कायद्याचा व्यवसाय करणाऱ्यांना तसेच इतर नागरिकांनाही हे प्रकाशन उपयुक्त असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या प्रकाशनाद्वारे राज्याचे सर्व अधिनियम हे सर्वसाधारण जनतेला वाजवी किंमतीत उपलब्ध करुन देण्याचा उद्देश आहे. अधिनियमांच्या (इंग्रजी) पुनर्मुद्रणाचे काम आणि महाराष्ट्र संहिता अद्ययावत ठेवण्यासाठी पुन:स्थापना मालिका वेळोवेळी काढण्याचे काम, त्याचप्रमाणे राज्य अधिनियम (इंग्रजी) शासनाच्या संकेतस्थळावर (वेबसाईट) घेण्याचे काम देखील या शाखेत सचिव (विधि विधान), विधि व न्याय विभाग यांच्या देखरेखीखाली आणि प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) यांच्या सहकार्याने होत असते.

**वैधानिक बाबींवर अभिप्राय / सल्ले देणारा भाग :**

**(ब)** या शाखेस **"अ"** शाखा असे संबोधले जाते. या शाखेचा संबंध मुख्यत: मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांना न्यायालयात प्रलंबित नसलेल्या दिवाणी व सर्व फौजदारी प्रकरणी विधिविषयक सल्ला देण्याच्या कामाशी तसेच विद्यापीठांच्या कायद्यानुसार कुलगुरु/राज्यपाल यांच्या कार्यालयास अभिप्राय देण्याच्या कामाशी येतो. "अ" शाखेकडून पुढील कामे हाताळली जातात.

(१) मंत्रालयीन विभागांना सर्व फौजदारी तसेच न्यायालयात प्रलंबित नसलेल्या  दिवाणी प्रकरणात विधिविषयक सल्ला देणे. (यामध्ये सांविधानिक कायदे, प्रशासकीय कायदे/नियम, सेवाविषयक बाबी इ. विषयांच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागाच्या अधिनस्त कार्यालयांनी त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत सादर केलेल्या विधिविषयक मुद्दयांच्या अनुषंगाने विधिविषयक सल्ला देणे)

(२) फौजदारी प्रकरणांमध्ये सत्र न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात अपील करणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे व त्याअनुषंगिक कामकाज

(३)जामीन रद्द करणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे व त्या अनुषंगीक कामकाज

(४) फौजदारी प्रकरणांमध्ये पुनर्निरिक्षण अर्ज दाखल करण्याच्या प्रस्तावांची छाननी करणे व त्या अनुषंगिक कामकाज

(५)फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत मधील तरतूदींनुसार खटला मागे घेण्याच्या प्रकरणांत अभिप्राय देणे.

(६)लाचलुचपत प्रतिबंधक कायदा तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत शासकीय कर्मचा-यांविरुध्द अभियोग दाखल करणेबाबतच्या प्रकरणांत अभिप्राय देणे.

(७)फौजदारी प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच सर्वोच्च न्यायालयात विशेष सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती करणे.

(८)महाराष्ट्र राज्यातील सत्र न्यायालय तसेच उच्च न्यायालय, मुंबई येथे इतर राज्य शासन पक्षकार असलेल्या फौजदारी प्रकरणांत संबंधित  राज्य शासनाची बाजू मांडण्यासाठी सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती करणे. त्याचबरोबर इतर राज्यातील न्यायालयात फौजदारी प्रकरणांमध्ये महाराष्ट्र शासन पक्षकार असलेल्या प्रकरणांत महाराष्ट्र शासनाची बाजू मांडण्यासाठी संबंधित राज्यातील सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.

**(क)शहरातील दिवाणी कज्जे व अभिहस्तांतरण :**

यासबंधाने काम पहाणाऱ्या शाखेस **“ई”** शाखा असे म्हणतात.  या शाखेकडून पुढील कामे हाताळली जातात.

(१)सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, उच्च न्यायालय, मुंबई (मूळ व अपिलीय शाखा) तसेच मुंबई शहरातील लघूवाद न्यायालय, नगर दिवाणी न्यायालय, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, विक्रीकर न्यायाधिकरण, महसूल न्यायाधिकरण, ऋण वसूली न्यायाधिकरण, कामगार व औद्योगिक न्यायालये इत्यादि प्रलंबित प्रकरणांच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त प्रस्तावांमध्ये सल्ला देणे तसेच न्यायालय/न्यायाधिकरणांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध अपील/ पुर्नविलोकन/पुर्ननिरिक्षण करण्याच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागांना सल्ला देणे व त्या अनुषंगाने सरकारी वकीलांना आवश्यक सूचना देणे.

तसेच वरील सर्व प्रलंबित प्रकरणी मंत्रालयीन विभागांना सल्ला देणे, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, उच्च न्यायालय, मुंबई, प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणामध्ये शासनाच्या वतीने महाअधिवक्ता/विशेष समुपदेशी/ सरकारी वकील यांची नियुक्ती करणे.

(२)महाराष्ट्राचे राज्यपाल ज्यात पक्षकार आहेत असे भाडेपट्टा लेख, लायसन्स, करारनामा इत्यादी विलेख अगर लेख यांची छाननी करणे व शहर अभिहस्तांतरणांतर्गत मसुदा तयार करणे व छाननी करणे.

(३)नौविधी अधिकरिता, वाद व समन्स आणि सन १९५२ च्या लेखा प्रमाणक (नोटरी) अधिनियमांतर्गत कामे.

**(ड)मुफसल कज्जे :**

या शाखेस **"म"** शाखा असे संबोधले जाते. या शाखेकडून पुढील कामे केली जातात :-

(१)विदर्भ आणि मराठवाडा विभागाव्यतिरिक्त इतर विभागातील मुफसल कज्जांच्या कामात शासनाच्या वतीने कज्जे दाखल करणे तसेच कज्जात शासनाच्या वतीने बचाव करणे व या कामाच्या सुसाध्यतेबद्दल सल्ला देणे. कज्जाची व कैफियतेची छाननी करणे आणि मा. जिल्हा न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करणे अगर न करणे इ. कामांचा समावेश होतो. या विभागातून इतर राज्याच्या वतीने किंवा भारतातील इतर राज्यातील अधिकाऱ्यांच्या वतीने आणि भारत सरकार व त्यांचे अधिकारी यांच्या वतीने मुफसल न्यायालयामधील दिवाणी कज्जांवर लक्ष ठेवण्यात येते व असे कज्जे चालविण्यात येतात.

(२)जिल्ह्यातील शासकीय मुफसल खटल्यावर योग्य नियंत्रण ठेवण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र शासनाने १९७७ पासून जिल्हा सरकारी वकीलांच्या कार्यालयाच्या तपासणीचे काम हाती घेण्याची योजना सुरु केली आहे. सॉलिसिटर (मुफसल वाद), अपर सॉलिसिटर (मुफसल वाद) यांनी या तपासण्या करावयाच्या असतात. अशा तपासणीच्या वेळी जिल्ह्यातील सर्व स्थानिक अधिकारी व न्यायासनाचे अध्यक्ष व सदस्य यांच्याशी संपर्क साधून शासकीय कज्जासंबंधीच्या बाबींसंबंधी चर्चा केली जाते. मुफसल क्षेत्रातील शासकीय दिवाणी खटल्यांचे प्रभावी पर्यवेक्षण करण्याच्या आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने आणि अडचणी दूर करण्याच्या व विधि अधिकाऱ्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याच्या, तसेच जिल्हा कार्यालयातील कामाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.

(३)प्रशासकीय सोयीसाठी नागपूर आणि औरंगाबाद येथे विभागाच्या दोन स्वतंत्र शाखा आहेत. ह्या मंत्रालयीन विभागाचाच एक भाग असून त्या-त्या महसूल विभागाच्या कक्षेत काम करतात. या शाखांना सह सचिवांच्या दर्जाचे अधिकारी आहेत. नागपूर आणि औरंगाबाद येथे असलेल्या विधि व न्याय विभागाच्या शाखा अनुक्रमे विदर्भ आणि मराठवाडा विभागातील दिवाणी व फौजदारी कज्जे, अभिप्रायाच्या बाबी तसेच रिट वादाच्या सूचना आणि किरकोळ बाबी यासंबंधी कार्यवाही करतात.

(इ) **र शाखा :**

नियम व आदेश अद्ययावत करणाऱ्या शाखेस **"र"** शाखा असे संबोधले जाते. महाराष्ट्र नियम व आदेश हे सर्वात जुन्यापैकी एक महत्त्वाचे प्रकाशन असून त्यामध्ये भारतीय संविधानासहित केंद्राने व राज्याने केलेल्या निरनिराळया अधिनियमाखाली राज्य शासनाने केलेले नियम व आदेश समाविष्ट आहेत. हे प्रकाशन दोन भागात म्हणजे राज्याने केलेल्या अधिनियमाखाली केलेले नियम व आदेश आणि केंद्राने केलेल्या अधिनियमाखाली केलेले नियम व आदेश यामधील सर्व महत्त्वाच्या दुय्यम विधि विधानाचा एकाच ठिकाणी समावेश केलेला आहे. हे प्रकाशन विधानमंडळाचे सभासद, न्यायालये, वकील वर्ग व सर्वसाधारण जनता यांना उपयुक्त ठरते, असे आढळून आले आहे. वेळोवेळी पुन:स्थापना मालिका काढून हे नियम व आदेश अद्ययावत ठेवण्यात येत आहेत. सचिव , (विधि विधान) विधि व न्याय विभाग यांच्या देखरेखीखाली विधि व न्याय विभागाची "र" शाखा हे काम पाहते.

(२)**विधिविषयेतर शाखा**

विधि व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या खालील कार्यालयांच्या प्रशासकीय व वित्तीय बाबी या विभागाकडून हाताळण्यात येतात .

१ विधि व न्याय विभाग (मंत्रालय खुद्द)
२ महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
५. राज्यातील सर्व न्यायालये
६. मुंबईचे शेरीफ
७. विधि सल्लागार व समुपदेशी
    १.सरकारी वकील, उच्च न्यायालय(अपील शाखा/मूळ शाखा/रिट शाखा), मुंबई
    २.सरकारी वकील, उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद/खंडपीठ नागपूर
    ३.सरकारी वकील, नगर दिवाणी न्यायालय, मुंबई
    ४.सरकारी वकील, लघुवाद न्यायालय, मुंबई
    ५.सरकारी अभियोक्ता, सत्र न्यायालय , मुंबई
    ६.सरकारी वकील, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली
    ७.जिल्हा सरकारी वकील, संबंधित जिल्हा
    ८.मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
    ९.मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद/खंडपीठ नागपूर
८. निबंधक, भागीदारी संस्था
९. महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण
१०.शासन अधिनियमान्वये नियंत्रित देवस्थाने

तसेच या विभागाकडून उच्च न्यायालयाशी संबंधित वित्तीय बाबीही हाताळल्या जातात.

नागपूर व औरंगाबाद येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची स्थापना झाल्यानंतर या विभागाच्या आस्थापनेअंतर्गत नागपूर व औरंगाबाद येथे सह सचिव यांच्या नियंत्रणाखाली कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. ही कार्यालये संबंधित खंडपीठातील विविध विभागांच्या प्रकरणी विधिविषयक सल्ले देण्याचे काम करतात.

**या विभागामधून विभागाच्या अधिपत्याखालील व विभागामधील विविध कार्यासन /शाखा मधून सेवा /सुविधा पुरविल्या जातात. याबाबतची विवरणपत्रे पुढील पृष्ठांवर आहेत.**

**१) विवरणपत्र - १ (माहिती अधिकार /प्रकरणे)**

या विभागातील विविध कार्यासनाकडे जनतेकडून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना अधिनियमात विहित केलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत माहिती अधिकाऱ्यांकडून उत्तर पाठविले जाते. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून या संबंधातील अपीलांना विहित ३० दिवसांत सुनावणी देऊन उत्तर दिले जाते. तसेच कार्यालयातील कामकाजाच्या विलंबास प्रतिबंध करण्याबाबत शासनाने लागू केलेल्या अधिनियम,२००५ नुसार प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढण्याची जबाबदारी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आहे. विभागातील एखाद्या कार्यासनातील कामाबाबत तक्रार असल्यास याबाबत संबंधित कार्यासनाचे अवर सचिव किंवा सह/उप सचिव यांना भेटता येईल. तसेच विभागातील एखाद्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द तक्रार असल्यास व्यक्तिश: सहसचिव (प्रशासन) यांना भेटता येईल.

**२) विवरणपत्र- २ (नोटरीच्या नियुक्त्या)**

या विभागात जनतेचा प्रत्यक्ष संबंध येत असलेले कार्यासन पुढीलप्रमाणे आहेत .

या विभागातील “इ” शाखेकडून खाजगी वकीलांच्या नोटरी म्हणून नियुक्त्या केल्या जातात. याबाबत सोबत जोडलेल्या विवरणपत्र- २ मध्ये माहिती दिली आहे.

**३) विवरणपत्र - ३ (देवस्थाने)**

या विभागाकडून खालील देवस्थानांचे प्रशासन केले जाते .

१.श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० नुसार श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास दादर, मुंबई
२.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था, शिर्डी
३.श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर
४.पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर
५.श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**४) विवरणपत्र - ४**

महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण : मोफत कायदेविषयक सहाय्य पुरविणे.

५) विवरणपत्र -५ (धर्मादाय)

**या विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य या कार्यालयाअंतर्गत संस्था नोंदणी अधिनियम, १८६० तसेच, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था सेवाभावी स्वरुपाचे काम करतात.**

सार्वजनिक न्यासाअंतर्गत नोंदणी झालेल्या सेवाभावी संस्थांमार्फत पूरग्रस्तांना मदत, अनाथालय चालविणे, महिलांसाठी रोजगार किंवा स्वयंरोजगार चालविणे, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच धर्मादाय रुग्णालयांतर्गत निर्धन व दुर्बल रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार देणे यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

धर्मादाय रुग्णालयामार्फत निर्धन व दुर्बल घटकातील जनतेला पुरविण्यांत येणारी सेवा :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ३१३२/२००४ मध्ये दिनांक १७/८/२००६ व दिनांक १५.४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१ अ अ अन्वये निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळण्याकरिता योजना मंजूर केली आहे. या योजनेतील तरतूदींनुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने (ज्यांचा वार्षिक खर्च रु.५,००,०००/- पेक्षा जास्त आहे) त्यांच्या रुग्णालयातील एकूण कार्यान्वित खाटांपैकी १०% खाटा निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १०% खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे.

रु.१,८०,०००/- वार्षिक उत्पन्न असणाऱ्या निर्धन घटकातील रुग्णास व रु.३,६०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या दुर्बल घटकातील रुग्णास या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.

**याबाबतची माहिती धर्मादाय आयुक्त यांच्या** https://charity.maharashtra.gov.in/mr-in/ **या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

**उपरोक्त योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर संनियंत्रण व देखरेख करण्यासाठी पुढीलप्रमाणे विविध समित्या गठित करण्यांत आलेल्या आहेत .**

१.देखरेख समिती :-

यामध्ये बृहन्मुंबई विभागासाठी धर्मादाय सह आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे अध्यक्ष असून, सह संचालक, आरोग्यसेवा (वैद्यकीय), मुंबई हे सदस्य सचिव आहेत. तसेच, मुंबईतील धर्मादाय रुग्णालयांच्या संघटनेचा सचिव किंवा नामनिर्देशित व्यक्ती तसेच आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई हे सदस्य असतात. तसेच, इतर जिल्हयासाठी विभागीय स्तरावरील धर्मादाय सह आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी हे अध्यक्ष असून जिल्हा शल्य

चिकित्सक हे सदस्य सचिव तर जिल्हा परिषदेचा आरोग्य अधिकारी व जिल्हयातील धर्मादाय रुग्णालयाचा प्रतिनिधी हे सदस्य असतात.

२.<u>जिल्हाधिकारी समिती</u> :-

यामध्ये संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे समितीचे अध्यक्ष असून, जिल्हयातील दोन मा.विधानसभा/परिषद सदस्य, संबंधित जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असल्यास संबंधित जिल्हयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील समाजसेवक, जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील समाजसेवक, जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील दोन तज्ञ हे सदस्य तर सहायक धर्मादाय आयुक्त हे सदस्य सचिव असतात.

३. <u>विधानमंडळाची तदर्थ संयुक्त समिती</u> :-

यामध्ये राज्यमंत्री, विधि व न्याय विभाग हे अध्यक्ष असतात. इतर विधानमंडळ सदस्य हे समितीचे सदस्य असतात.

त्यानुसार, वरीलप्रमाणे धर्मादाय संघटना व विविध समित्यांमार्फत राज्यभरातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर मोफत व सवलतीच्या दरात उपचार करण्याबाबतच्या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर देखरेख केली जाते

तसेच धर्मादाय रुणालयात निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित खाटा पारदर्शी पध्देतीने निर्धन व गरीब रुग्णांना उपलब्ध करुन देण्यासाठी विधि व न्याय विभागाच्या दि.३१/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर कक्षाच्या नावामध्ये दि.२४/०२/२०२५ च्या शासन निर्णयान्वये "धर्मादाय रुणालय मदत कक्ष “ अशी सुधारणा करण्यात आली आहे.

**६) विवरणपत्र- ६**

**विशेष सरकारी वकील नियुक्तीसंदर्भातील माहिती देण्यात आलेली आहे**

**७) विवरणपत्र ७ (निबंधक भागीदारी संस्था)**

नोंदणीकृत सेवाभावी संस्थांबाबत नागरिकांसाठी अधिक माहिती ही ऑनलाईन पध्दतीने निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नागरिकांची सनद स्वतंत्ररित्या https://rof.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**या विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांकडून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये जनतेस पुरविण्यांसाठी अधिसूचित करण्यांत आलेल्या सेवा :-**

१)राज्य विधिसेवा प्राधिकरणाने द्यावयाचे कायदेविषयक मोफत सहाय्य (विवरणपत्र ४)

२)महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या तरतूदीनुसार विश्वस्त व्यवस्थांची नोंदणी **धर्मादाय आयुक्त यांच्या** https://charity.maharashtra.gov.in/mr-in/ **या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.** (विवरणपत्र ५ )

३)संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० मधील २१) मधील कलम ३ नुसार संस्था नोंदणी. **धर्मादाय आयुक्त यांच्या** https://charity.maharashtra.gov.in/mr-in/ **या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.** (विवरणपत्र ५ )

४)भागीदारी संस्था अधिनियम, १९५२ अन्वये भागीदारी संस्थेची नोंदणी निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नागरिकांची सनद स्वतंत्ररित्या https://rof.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

---